स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade





**Director, Board of Examination & Evaluation**

Phone: (02462) 229294
Fax : (02462) 229520
Website: www.srtmun.ac.in
E-mail: srtmuncoe@gmail.com


संदर्भ : परीक्षा/समन्वय/2017–2018/4165 दिनांकः 16.02.2018

**प्रति,**
**मा.प्राचार्य तथा केंद्र प्रमुख,**
सर्व संलग्नीत पदवी/पद्व्युत्तर महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ.

**विषयः उन्हाळी–2018 परीक्षा पूर्व तयारी बाबत.**

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी–2018 पदवी परीक्षा दि.15.03.2018 तसेच पद्व्युत्तर व व्यवसायिक परीक्षा हया दिनांक 09.04.2018 व 20.04.2018 पासुन सुरू होत आहेत. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आले आहे. तसेच उन्हाळी–2018 परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपाय योजना आपल्या परीक्षा केंद्रामार्फत करण्यात याव्यात.

1. उन्हाळी परीक्षा–2018 साठी परीक्षा केंद्राची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहिर करण्यात येणार असून त्यानुसार परीक्षार्थीसाठीची बैठक व्यवस्था व मनुष्य बळाचे नियोजन करण्यात यावे.
2. परीक्षा केंद्र प्रमुखाची जबाबदारी ही महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी स्वीकारणे बंधनकारक असून अपवादात्मक परिस्थितीत इतर शिक्षकांची केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यासाठी परीक्षा विभागाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे तसेच संवैधानिक जबाबदारी प्राचार्यांचीच असेल. परीक्षा केंद्रप्रमुख/प्राचार्याचे नांव, फोन नंबर व ईमेल पत्ता इत्यादी माहिती दिनांक 28 फेब्रुवारी 2018 पर्यंत परीक्षा विभागास पाठविण्यात यावी.
3. उन्हाळी परीक्षा–2018 साठी विद्यापीठ स्तरावर सहकेंद्रप्रमुख (JCS) नेमणूक करणेसंबधी आपल्या महाविद्यालयातील दोन सहा. प्राध्यापकांची नावे, त्यांचे मोबाईल नंबर व ईमेल पत्ता इत्यादी माहिती दिनांक 28 फेब्रुवारी 2018 पर्यंत परीक्षा विभागास कळविण्यात यावे. बी.ए. व बी.एस्सी. या अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठी अधिक कालावधी लागत असल्यामुळे या परीक्षा केंद्रावर पहिल्या 20 दिवसांसाठी एक व त्यानंतरच्या कालावधीसाठी एक अशा दोन टप्प्यात सहकेंद्रप्रमुख देण्यात येइल. यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नावे पाठवितेवेळी ज्या

विषयाची परीक्षा आहे ते विचारात घेवून सहकेंद्रप्रमुखांची नावे पाठवावीत जेणे करून महाविद्यालय मुल्यांकनाच्या कामकाजात व्यत्यय येणार नाही.

4. उन्हाळी परीक्षा–2018 साठी विद्यापीठ स्तरावर भरारी/दक्षता पथकाची नेमणूक करणेसंबधी आपल्या महाविद्यालयातील तीन ते चार सहा.प्राध्यापकांची नावे, त्यापैकी एक महिला प्राध्यापक उपलब्ध असल्यास त्यांचे मोबाईल नंबर व ईमेल पत्ता इत्यादी माहिती दिनांक 28 फेब्रुवारी 2018 पर्यंत परीक्षा विभागास कळविण्यात यावी. जेणे करून दक्षता पथकामध्ये नावे समाविष्ट करण्यात येतील.

5. विद्यापीठ परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार घडू नये म्हणून महाविद्यालयीन स्तरावर तीन सदस्यीय दक्षता पथकाची नेमणूक करण्यात यावी. त्यामध्ये एक महिला सदस्य असेल.

6. उन्हाळी–2018 परीक्षेसाठी प्रश्न पत्रिका हया Online E-Delivery मार्फत पाठविण्यात येणार आहे, त्यामुळे E-Delivery of Question Paper downloading साठी स्वतंत्र गोपनीय कक्ष असणे आवश्यक असून त्यामध्ये अद्यावत संगणक, झेरॉक्समशीन, प्रिंटर तसेच विद्युतपुरवठा अखंड राहणे करीता युपीएस/जनरेटर इत्यादी साहित्य उपलब्ध ठेवावे.

7. E-Delivery of Question Paper साठी स्वतंत्र गोपनीय कक्षात काम करणारे प्रशिक्षीत अधिकारी, कर्मचारी नेमणूक करून त्यांची नावे परीक्षा विभागास दिनांक 28 फेब्रुवारी 2018 पर्यंत कळवावे. तसेच गोपनीय कक्षात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे चालू ठेवणे बंधनकारक आहे.

8. परीक्षा सुरक्षित व कॉपीमुक्त तसेच मोकळया वातावरणामध्ये पार पाडणेसंबधी परीक्षा केंद्राच्या प्रत्येक परीक्षा हॉलमध्ये CCTV Camera बसविण्यात यावे. जेणे करून परीक्षेदरम्यानच्या गैरप्रकारास आळा बसेल.

9. परीक्षा केंद्रामध्ये परीक्षार्थींना प्रवेश देतांना त्यांची तपासणी करून परीक्षा दालनात प्रवेश देण्यात यावा. परीक्षा दालनात मोबाईल, कॅलक्युलेटर, इतर परीक्षेसंबधीची यांत्रीक उपकरणे गैरप्रकारासंबधीची साधने वापरण्यास सक्त मनाई करण्यात यावी.

10. ज्या महाविद्यालयात मान्यताप्राप्त प्राचार्य नसतील, आवश्यक सोयी सुविधा नसतील अशा महाविद्यालयाचे केंद्र इतर महाविद्यालयास देण्यात येईल त्यानुसार बैठक व्यवस्था करावी लागेल. त्यासाठीचा प्रशासकीय खर्च प्रती विद्यार्थी प्रमाणे देय्य असेल.

कृपया वरील प्रमाणे पूर्वतयारी करावी व सदर माहिती परीक्षा विभागास दिनांक 28.02.2018 पर्यंत srtmuncoe@gmail.com या ईमेल किंवा खास दुतामार्फत किंवा डाकने परीक्षा विभागास पाठवून देण्यात यावी व उन्हाळी–2018 परीक्षा यशस्वीरीत्या पार पाडणेसाठी सहकार्य करावे, कळावे.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ